October 23, 2026

The Compliance Manager
BSE Limited
Corporate Relationship Department,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai 400001.
Scrip Code: **500655**

The Manager, Listing Department
National Stock Exchange of India Limited
Exchange Plaza, Plot No. C/1, G Block,
Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai 400 051.

Trading Symbol: **GRWRHITECH**

Dear Sir/Madam,

Subject: Newspaper Publication

Pursuant to Regulation 30 and Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations"), please find enclosed herewith extract of the following Newspapers, containing publication of Unaudited Financial Results (Standalone and Consolidated) for the quarter and half year ended September 30, 2026;

1. The Economic Times (English)
2. Maharashtra Times (Marathi)
3. Sanjay Warta (Marathi)

Clippings of the said newspaper publications are available on website of the Company at https://www.garwarehitechfilms.com.

Thanking You.

Yours Faithfully,

For **Garware Hi-Tech Films Limited**

AWANEESH KUMAR SRIVASTAVA
Digitally signed by AWANEESH KUMAR SRIVASTAVA
Date: 2026.10.23 14:54:32 +05'30'

Awaneesh Srivastava
Company Secretary
FCS 8513

Encl.: As stated above

THREE DAYS AFTER SC RESTORES ₹8,415-CR BONDS

YES Bank AT1 Coupon Due, Bondholders Seek Clarity

Saloni Shukla

Mumbai: A coupon payment on YES Bank's additional tier one (AT1) bonds fell due just three days after the Supreme Court restored ₹8,415 crore worth of such principal instruments, but bondholders said no payment has been received, prompting them to ask Axis Trustee Services to seek an immediate clarification from the private lender. "We call upon the Trustee to obtain immediate written confirmation from Yes Bank as to whether this coupon has been paid, cancelled or remains outstanding," an association of bondholders said in its letter seen by **ET**.

The annual coupon on the 9% bonds fell due on October 18, while the Supreme Court order restoring the bonds came on October 15. Another coupon payment is approaching.

The annual coupon on 9.5% AT1 bonds is scheduled for December 23, and bondholders have asked the trustee to obtain clarity in advance on its treatment, the relevant record date, identification of eligible beneficial owners and arrangements for payment.

The demands follow the SC's judgment upholding the Bombay HC's decision setting aside the write-down of YES Bank's AT1 bonds undertaken as part of the lender's reconstruction in March 2020.

The bondholders have relied on the judgment, which states that the annual coupon rate would remain unaffected by the outcome of the appeals and that payments would have to be made in accordance with the respective information memoranda. The association has also sought an issue-wise position from YES Bank on coupons that fell due between 2020 and 2025, including whether each payment was due, paid, unpaid or cancelled and the contractual basis for such treatment. It has also sought details of any coupon-cancellation notices issued by the lender since March 2020.

"If Yes Bank fails to provide a satisfactory response or take the necessary steps, identify and pursue the appropriate contractual, regulatory and legal measures available to the Trustee to protect bondholders' interests," the letter said.

Nippon AMC Gets Sebi Nod for Settlement in Yes Bank AT1 Case

MUMBAI Nippon Life India AMC said on Thursday that Sebi has given its in-principle approval to a settlement in a case related to investments by certain MF schemes in Yes Bank's AT1 bonds. The AMC said it has paid ₹96.8 crore towards the settlement, including ₹89.1 crore towards reversal of management fees earned on the investments, along with interest, and ₹7.7 crore towards settlement amounts for the company and certain officials. The final settlement order from Sebi is awaited. The company had received a show-cause notice from Sebi in August, 2024, alleging "non-compliance with certain securities laws" in relation to investments made by some of Nippon's schemes in Yes Bank's AT1 bonds.

The company and certain officials named in the notice subsequently filed settlement applications without admitting or denying the findings. – **Our Bureau**

BKT to Make up to 8L Pirelli-branded Car Tyres by 2030

Our Bureau

Mumbai: Balkrishna Industries (BKT) will manufacture up to 800,000 Pirelli-branded car tyres by 2030 under a strategic agreement with the Italian tyre maker, which is looking to strengthen its presence in the Indian market, the companies said in a joint statement. Under the first phase of the agreement, BKT will produce the tyres at one of its newly constructed plants, adhering to Pirelli's technology and quality standards.

The partnership also envisages a second phase, subject to certain conditions, involving the creation of a 50:50 joint venture and the construction of a dedicated manufacturing plant for high-value car tyres under both the Pirelli and BKT brands. The facility would cater to India and international markets.

The agreement comes as India's car market expands, with vehicle registrations projected to grow 5-7% annually between 2025 and 2030.

For Pirelli, which currently has only a commercial presence in India, the agreement marks a step towards strengthening its position in a market with growing demand for premium and high-value tyres.

"India is taking an ever more central role in the evolution of the global automotive industry, thanks to the market's growth, development of mobility and progressive strengthening of the Country's industrial and technological competencies," said Marco Tronchetti Provera, executive chairman of Pirelli. Rajiv Poddar, joint managing director of BKT, said the partnership recognised the company's manufacturing strength, quality and expertise built over decades.

हिन्दुस्तान पेट्रोलियम

हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
Hindustan Petroleum Corporation Limited

एक महारत्न सीपीएसई | A Maharatna CPSE CIN: L23201MH1952GOI008858

STANDALONE & CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & SIX MONTHS ENDED 30TH SEPTEMBER 2026

(Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirement) Regulations, 2015)

The results can be accessed through the following link or scan:
https://www.hindustanpetroleum.com/images/pdf/FinResQ2FY2627.pdf

By order of the Board
Hindustan Petroleum Corporation Limited

Sd/-
Srividya Venkataraman
Director - Finance
(Whole - Time Director)
DIN - 09548415
Date: 22/10/2026 Place: Mumbai


Quarterly Highlights

₹ 3,483 Crore
Standalone Profit After Tax

₹ 3,625 Crore
Consolidated Profit After Tax

12.73 MMT
Sales Volume

6.20 MMT
Crude Thruput



Petroleum House, 17 Jamshedji Tata Road, Churchgate, Mumbai - 400020
Website: www.hindustanpetroleum.com | email: corphqo@hpcl.in

THE MORNING BRIEF PODCAST



Anirban Chowdhury speaks to Sugata Ghosh of The Economic Times about what AT1 bonds are, the legal dispute over Yes Bank's rescue, the Court's criticism of RBI and the bank, and the parallel case involving Credit Suisse AT1 bonds in Switzerland

Available on EconomicTimes.com /podcast, Amazon Prime Music, Apple Podcasts, JioSaavn *and* Spotify.

ADDENDUM TO PUBLIC NOTICE – SIXTH E-AUCTION DATED 29.09.2026
IVRCL LIMITED UNDER LIQUIDATION
As per Insolvency and Bankruptcy Code, 2016
E-mail id: ivrcl.liquidation@gmail.com, www.ivrcl.com


ADDENDUM
Sale of Assets under Insolvency and Bankruptcy Code, 2016

In respect of auction sale notice issued by the undersigned on 29.09.2026 for sale through e-auction of IVRCL Limited, the timelines of the said process are revised as under. The Sale will be done by the undersigned through the E-Auction platform at the web portal https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home
Brief particulars of the sale are as follows:

Description	As per the Auction Notice	As Amended
Category A - Sale of Corporate Debtor as a Going Concern: **Asset Set 1:** Sale of Corporate Debtor as a going concern on **"AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS" AND "WITHOUT RECOURSE BASIS"**	23.10.2026 at 11.00 AM to 01.00 PM	30.10.2026 at 11.00 AM to 01.00 PM
Category B- Sale of Investments of the CD (In case no bids are received for auction under Category A) **Asset Set 2:** Sale of Investments of the CD in Salem Tollways Limited (SPV) being part of assets of the CD on **"AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS" AND "WITHOUT RECOURSE BASIS"** **Asset Set 3:** Sale of Investments of the CD in Kumarpallayam Tollways Limited (SPV) being part of assets of the CD on **"AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS" AND "WITHOUT RECOURSE BASIS"**	23.10.2026 at 02.00 PM to 04.00 PM	30.10.2026 at 02.00 PM to 04.00 PM
Category C-Sale of Non-Core Assets of the CD (In case no bids are received for auction under Category A) **Asset Set 4:** Sale of individual asset(s) being part of non-core assets of the CD as further listed in "Non-core Assets Part 1" on **"AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS" AND "WITHOUT RECOURSE BASIS"** **Asset Set 5:** Sale of scrap PAN India being part of non-core assets of the CD as further listed in "Non-core Assets Part 2" on **"AS IS WHERE IS", "AS IS WHAT IS", "WHATEVER THERE IS" AND "WITHOUT RECOURSE BASIS"**	23.10.2026 at 02.00 PM to 04.00 PM	30.10.2026 at 02.00 PM to 04.00 PM
Last Date for Submission of Documents & EMD	October 21, 2026 before 05:00 P.M.	October 28, 2026 before 05:00 P.M.
Site Visits	Between **10:00 AM to 5:00** PM from September 29, 2026 to October 21, 2026.	Between **10:00 AM to 5:00** PM till October 28, 2026

Date: October 23, 2026
Place: Hyderabad

Purusottam Behera
Liquidator of IVRCL Limited
Registration No. IBBI/IPA-002/IP-N00940/2019-2020/12993
Email ID – ivrcl.liquidation@gmail.com





EXTRACT OF UNAUDITED STANDALONE & CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED SEPTEMBER 30, 2026.

₹ In Crores

Particulars	Standalone						Consolidated					
	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended
	30.09.2026 (Unaudited)	30.06.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	30.09.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	31.03.2026 (Audited)	30.09.2026 (Unaudited)	30.06.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	30.09.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	31.03.2026 (Audited)
Total income from operation	680.73	600.14	554.67	1,280.87	1,021.41	2,044.15	715.06	652.80	583.55	1,367.86	1,091.92	2,184.95
Net Profit/(Loss) for the period before Tax and exceptional items	176.51	168.15	131.91	344.66	231.02	434.41	173.06	176.46	120.39	349.52	230.72	446.22
Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional items)	176.51	168.15	131.91	344.66	231.02	434.41	173.06	176.46	120.39	349.52	230.72	446.22
Net Profit/(Loss) for the period after tax and Exceptional items	139.87	126.58	106.52	266.45	181.11	334.73	129.44	132.65	91.23	262.09	174.25	338.23
Total Comprehensive Income for the period [Comprising profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	138.44	144.26	85.08	282.70	165.65	303.60	128.15	150.42	71.50	278.57	162.61	312.25
Equity Share Capital	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23
Reserves excluding Revaluation Reserve as at Balance sheet date				-	-	2,563.52				-	-	2,632.93
Earnings Per Share (not annualised) (face value of Rs.10 /- each)												
Basic :	60.20	54.49	45.85	114.69	77.96	144.08	55.71	57.10	39.27	112.81	75.00	145.59
Diluted:	60.20	54.49	45.85	114.69	77.96	144.08	55.71	57.10	39.27	112.81	75.00	145.59

Notes :

1) The above results have been prepared in accordance with Indian Accounting Standard (Ind As) under section 133 of the Companies Act, 2013 read with relevant Regulation 33 of the SEBI (LODR) Regulations, 2015, reviewed by the Audit Committee and approved and taken on record by the Board of Directors of the Company at their respective meetings held on 22nd October, 2026.
2) The Company operates in one segment only i.e. Polyester Films and therefore, has only one reportable segment in accordance with IND AS 108 "operating segments".
3) The above is an extract of the detailed format of Quarterly and Half Yearly Financial Results filed with the Stock Exchange under regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015. The full format of financial results are available on the website of stock exchanges(www.bseindia.com and www.nseindia.com) and also on the website of the Company (www.garwarehitechfilms.com).

The same can be accessed by scanning the QR Code provided below:

Place : Mumbai
Date : 22nd October, 2026

For GARWARE HI-TECH FILMS LIMITED

MONIKA GARWARE
VICE-CHAIRPERSON AND
JOINT MANAGING DIRECTOR
DIN : 00143400

GARWARE HI-TECH FILMS LIMITED

Registered Office : Naigaon, Post : Waluj, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad) - 431133 CIN : L10889MH1957PLC010889
Corporate Office : Garware House 50-A, Swami Nityanand Marg, Vile Parle (E), Mumbai-400 057
Website : www.garwarehitechfilms.com, **Telephone :** 6698 8000, **Email :** cs@garwarehitech.com

More Newspapers and Magazines telegram group join Search https://t.me/NewsTG8 (NewsTG8) ya Whatsapp ya telegram message this Number 8890050582

थोडक्यात

श्रीलंकेतील लोडशेडिंग अखेर थांबले

कोलंबो : नोरोक्कोलई कोळसा-आधारित वीज केंद्र पूर्ण क्षमतेने पूर्ववत झाल्याने श्रीलंकेतील वीजकपात पूर्णपणे संपल्याचे जाहीर करण्यात आले. श्रीलंकेच्या राष्ट्रीय वीज ग्रीड ऑपरेटरने ही घोषणा केली. यामुळे श्रीलंकेतील नागरिकांना आणि उद्योगांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून वीजपुरवठा बंद असल्याने श्रीलंकेतील जनजीवन विस्कळित झाले होते.

चेंगराचेंगरीच्या ठिकाणी पाहणी

कोलकाता : उत्तर कोलकात्यातील दुर्गापूजा मंडपात उत्सवाच्या पहिल्या दिवशी झालेल्या चेंगराचेंगरीत १९ जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने गुरुवारी घटनास्थळाची पाहणी केली. या वेळी न्यायवैद्यक कर्मचारीही उपस्थिती होते. 'एसआयटी'चे सदस्य सुमारे १५ मिनिटे घटनास्थळी होते. त्यानंतर त्यांनी काही प्रत्यक्षदर्शींशी चर्चा केली.

मंत्र्यांना अडवले; चौकशीचे आदेश

बेंगळूरू : कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी २१ ऑक्टोबर रोजी मैसूरू येथे नंदीध्वज पूजेच्या वेळी राज्यातील चार मंत्र्यांना पूजेच्या स्थळी प्रवेश नाकारल्याचा आरोप असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांविरुद्ध गुरुवारी चौकशीचे आदेश दिले. शिवराज तंगडगी, पी. एम. नरेंद्र स्वामी, एच. सी. बालकृष्ण आणि के. एस. बसवंतप्पा अशी प्रवेश नाकारण्यात आलेल्या मंत्र्यांची नावे आहेत.

आरोपीला जामीन नाकारला

नवी दिल्ली : संघटित सायबर गुन्हेगारी टोळीचा भाग असल्याचा आरोप असलेल्या एका व्यक्तीस दिल्ली न्यायालयाने जामीन नाकारला. या प्रकरणात फसवणूक झाल्याचा आरोप असलेली २० लाख रुपयांहून अधिक रक्कम अद्याप वसूल व्हायची असल्याचे न्यायालयाने म्हटले. आरोपीने गुन्ह्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचा आरोप असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

दाऊद पाकिस्तानातच

डी-कंपनी 'भारतातील गुन्हेगारी टोळी' असल्याच्या माहितीवर भारताचा आक्षेप

वृत्तसंस्था, संयुक्त राष्ट्रे

चित्र : एआय



गँगस्टर दाऊद इब्राहिमच्या नेतृत्वाखालील डी-कंपनीला 'भारतातील गुन्हेगारी टोळी' असे संबोधणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातील माहितीवर भारताने तीव्र आक्षेप घेतला आहे. 'संयुक्त राष्ट्रांकडील नोंदींनुसार, अल-कायदाचा म्होरक्या ओसामा बिन लादेन पाकिस्तानात सापडला आणि तिथेच ठार झाला. दाऊददेखील त्याच देशात राहत आहे', या शब्दांत भारताने संयुक्त राष्ट्रांना खडसावून सांगितले.

संयुक्त राष्ट्रांतील भारताच्या स्थायी मिशनमधील प्रथम सचिव रघू पुरी यांनी बुधवारी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या तिसऱ्या समितीत भारताची भूमिका मांडली. दहशतवादाचा मुकाबला करताना मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्यांचे संरक्षण या विषयावरील संयुक्त राष्ट्रांचे विशेष प्रतिवेदक (संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेने नियुक्त केलेले स्वतंत्र मानवी हक्क तज्ज्ञ) बेन सॉल यांच्या अहवालावर उत्तर देताना त्यांनी हा प्रतिवाद केला. या अहवालात गंभीर तथ्यदोष असल्याचे सांगत, अशा अकार्यक्षमतेमुळे संयुक्त राष्ट्रांच्या विश्वासार्हतेला मोठी हानी पोहोचते, असे पुरी यांनी सुनावले.

पुरी म्हणाले, 'विशेष प्रतिवेदकांकडून तथ्यदोष असलेले अहवाल प्रसिद्ध केले जातात आणि त्याबद्दल त्यांना जबाबदार धरले जात नाही, ही अस्वीकारार्ह स्थिती आहे. याबाबत आमचे गंभीर आक्षेप आम्ही इतर मंचांवरही नोंदवत आलो आहोत.'

सन २००३मध्ये सुरक्षा परिषदेने अल-कायदाशी संबंध असल्याच्या कारणावरून भारतातील डी-कंपनी या गुन्हेगारी टोळीच्या प्रमुखाला यादीत समाविष्ट केले, असे सॉल यांच्या अहवालात म्हटले असल्याचे पुरी यांनी निदर्शनास आणले. 'ही ओळ स्वतंत्रपणे वाचली, तर प्रत्यक्ष वास्तवापेक्षा वेगळे चित्र उभे राहते', असे ते म्हणाले.

डी-कंपनीला 'भारतातील' म्हणण्यास विरोध करत पुरी म्हणाले की, ही गुन्हेगारी टोळी आणि तिचा म्होरक्या दाऊद इब्राहिम सन १९९३पासून दहशतवादी हल्ल्यांशी संबंधित प्रकरणांत भारताला हवा आहे. 'सन २००३मध्ये दहशतवादी घोषित करण्यापूर्वीच दाऊद भारतातून पळून गेला होता. देशाबाहेर असतानाच त्याला अल-कायदा आणि ओसामा बिन लादेनशी संबंध असल्याच्या कारणावरून दहशतवादी जाहीर करण्यात आले', असे पुरी म्हणाले.

भारताने सॉल यांच्या अहवालातील पक्षपातावरही आक्षेप घेतला. तसेच, दहशतवादाचे पुरस्कर्ते मानवी हक्क आणि दहशतवादविरोधी चौकटीचा गैरवापर करत असल्याचा आरोपही पुरी यांनी केला.

पंतप्रधानांना इस्रायलचे निमंत्रण

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

बेंजामिन नेतान्याहू यांनी साधला संवाद

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गुरुवारी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरून संवाद साधला. चर्चेदरम्यान नेतान्याहू यांनी इस्रायलच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित मुख्य सोहळ्यात भारतीय वैमानिक स्मित मच्छार यांच्यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पारंपरिक मशाल (टॉर्च) प्रज्वलित करण्याचे निमंत्रण दिले आहे.

नेतान्याहू यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर याविषयी माहिती देताना सांगितले, 'मी माझे मित्र, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा केली आणि इस्रायलच्या स्वातंत्र्यदिनी एका शूर भारतीय वैमानिकासोबत मशाल प्रज्वलित करण्याचे निमंत्रण त्यांना दिले.' ३० सप्टेंबर रोजी 'फ्लायदुबई'च्या विमानात सहवैमानिकाने स्मित मच्छार यांच्यावर चाकूने प्राणघातक हल्ला केला होता. जखमी अवस्थेतही मच्छार यांनी प्रसंगावधान राखून सहवैमानिकाला रोखले होते.

छायाचित्र प्रदर्शनावरून वाद

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली



- रेहान वड्रा यांची ७० छायाचित्रे हटवली
- बिकानेर हाऊस व्यवस्थापनाचा निर्णय
- प्रियांका गांधी यांची केंद्र सरकारवर टीका

काँग्रेस नेत्या आणि खासदार प्रियांका गांधी यांचे पुत्र, छायाचित्रकार रेहान वड्रा यांच्या छायाचित्र प्रदर्शनावरून गुरुवारी राजकीय वाद निर्माण झाला. दिल्लीतील बिकानेर हाऊसमध्ये आयोजित त्यांच्या प्रदर्शनातून ७० हून अधिक छायाचित्रे काढून टाकण्यास सांगण्यात आल्याचा आरोप रेहान यांनी केला आहे. ही छायाचित्रे गेल्या वर्षभरातील दिल्लीतील विद्यार्थी आणि युवकांच्या आंदोलनांवरील 'स्ट्रीट फोटोग्राफी' आहेत.

रेहान वड्रा यांच्या या प्रदर्शनाचे नाव 'नो आयडिया इज फाइन' असे होते. बुधवारी संध्याकाळी हे प्रदर्शन सुरू होणार होते. मात्र, प्रदर्शन सुरू होण्याच्या २४ तास आधी बिकानेर हाउस व्यवस्थापनाने संपर्क साधून काही छायाचित्रे त्यांच्या धोरणाविरुद्ध असल्याचे सांगितले, असा दावा रेहान यांनी केला. आक्षेप असलेली छायाचित्रे कोणती, ते सांगून त्यावर चर्चा करण्याचे आवाहन रेहान यांनी केले. मात्र, त्यास व्यवस्थापनाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. नंतर उपनिवासी आयुक्तांनी सर्व छायाचित्रे काढावी लागतील, असे सांगितल्याचे वड्रा म्हणाले.

रेहान यांच्या म्हणण्यानुसार, 'प्रदर्शनाचा आराखडा आठवडाभरापूर्वीच व्यवस्थापनाला पाठवण्यात आला होता. तेव्हा आक्षेप का घेतला नाही, असे विचारल्यावर आराखडा पाहता आला नाही, असे सांगण्यात आले. मग प्रदर्शन सुरू होण्याच्या काही तास आधी मी काय करणार? मी त्यांना लेखी स्वरूपात कारणे देण्यास सांगितले. प्रत्येक छायाचित्र का काढले जात आहे, याचे स्पष्टीकरणही मागितले; पण तसे करण्यात आले नाही', असा आरोप त्यांनी केला. रेहान यांनी तिरंग्याच्या दोन छायाचित्रांबाबतही आक्षेप नोंदवला. "आम्ही तिरंग्याची दोन छायाचित्रे ठेवली होती. त्यापैकी एक छायाचित्र व्यवस्थापनाने काढले. आता तिरंग्याचे एकच छायाचित्र शिल्लक आहे," असे त्यांनी म्हटले.

या प्रकरणात राजकीय हेतू आहे का, याबद्दल निश्चित सांगता येणार नाही, असे रेहान यांनी नमूद केले. मात्र, सार्वजनिक कला संस्थांनी कलाकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अशा प्रकारे निर्बंध आणू नयेत, असे ते म्हणाले.

> **"प्रदर्शित करण्यात आलेली काही छायाचित्रे बिकानेर हाउस मॅनेजमेंट सोसायटीच्या धोरणाचे उल्लंघन करणारी असल्याने ती काढून टाकण्याची विनंती करण्यात आली.**
> - व्यवस्थापन समिती

> मला माझ्या मुलाचा अभिमान आहे; पण जेव्हा कोणी कोणाच्या हावभावांनाही घाबरू लागते, तेव्हा हे समजले पाहिजे की त्यांनी आपली शक्ती गमावली आहे. रेहान तू सत्याच्या बाजूने उभा राहा; सुंदर गोष्टी आपोआप तुझ्यापर्यंत येतील.
> - प्रियांका गांधी, काँग्रेस नेत्या

जुन्या मशिदीला बजावली नोटीस

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

दिल्लीतील लोककल्याण मार्गालगत पंतप्रधानांच्या निवासस्थानापासून काही पावलांवर रेसकोर्स परिसरात असलेल्या एका ऐतिहासिक मशिदीच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. केंद्र सरकारच्या भूमी व विकास कार्यालयाने (एल अँड डीओ) ही मशीद आणि तिचा परिसर अनधिकृत असल्याचे सांगून ही जागा रिकामी करण्यासाठी संबंधितांना सहा दिवसांची मुदत दिल्याची नोटीस बजावली आहे.

सुमारे १०० ते १२५ वर्षे जुनी असल्याचे सांगितले जाणाऱ्या या मशिदीला नोटीस बजावल्यामुळे धार्मिक वास्तूंचे संरक्षण, सरकारी जमिनीचा वापर आणि कायदेशीर हक्क यांबाबत चर्चा सुरू झाली आहे. नवी दिल्ली नगरपालिका परिषदेकडून (एनडीएमसी) ७ ऑक्टोबर रोजीच मशिदीचा वीज आणि पाणीपुरवठा खंडित करण्यात आल्याचे वृत्त आहे. मशिदीचे इमाम मोहम्मद हारून यांच्या म्हणण्यानुसार परिसराच्या प्रवेशद्वारांना कुलूप लावण्यात आले असून सुरक्षा दल तैनात करण्यात आले आहे.

MACCIA 100
MiTEX MAHARASHTRA INTERNATIONAL TRADE EXPO
Presents
MEGA INTERNATIONAL SHOPPING FESTIVAL
16 ते 25 ऑक्टोबर
एम.एम.आर.डी.ए ग्राऊंड, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स
(एशियन हार्ट हॉस्पिटल जवळ)
शेवटचे 03 दिवस बाकी
फुल्ली एअर कंडीशण्ड
वेळ : सकाळी 11 ते रात्री 08
इंटरनॅशनल
साड्या आणि ड्रेसेस
ज्वेलरी
बॅग्स आणि ॲक्सेसरीज
फर्निचर आणि इंटिरिअर
किचन अप्लाअन्सेस
होम डेकोर
पॅकेज्ड फुड प्रोडक्टस
EXCLUSIVE PRODUCTS FROM GUJARAT
CRAFTS OF GUJARAT
ODOP
दररोज पहिल्या ५० खरेदीदारांसाठी रू. ४०००/- किंवा त्याहुन अधिक खरेदीवर मोफत भेटवस्तु
अफगाणिस्तान, थायलंड, कोरिया आणि दुबईमधील एक्सक्ल्युझिव्ह उत्पादने
50000 पेक्षा जास्त एक्सक्ल्युझिव्ह उत्पादने
भरपूर डिस्काउंट्स आणि ऑफर्स
300+ स्टॉल्स
@internationalshoppingexe
प्रवेश फी रु. 50/- प्रति व्यक्ती | # 93266 81330 / 79773 11198
शॉपर्स पॅराडाइस

'पक्षांतर प्रकरणात खासदारांना उत्तराची संधी'

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

तृणमूल काँग्रेसमधून बंडखोरी करून 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया'मध्ये (एनसीपीआय) विलीन झालेल्या २० खासदारांच्या प्रकरणासह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधातील महाभियोग प्रस्तावावरून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी गुरुवारी आपली भूमिका स्पष्ट केली.

मतदारसंघ फेररचनेच्या घटना दुरुस्ती विधेयकासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याच्या जोरदार हालचाली असल्याच्या संदर्भात बिर्ला यांनी स्पष्ट उत्तर दिले नाही. मात्र, पावसाळी अधिवेशन संस्थगित झाले नसल्याने तीन दिवसांची नोटीस देऊनही अधिवेशन बोलावण्याचा अधिकार लोकसभाध्यक्षांना असल्याचे बिर्ला यांनी सूचकपणे सांगितले. तृणमूलच्या २० खासदारांच्या पक्षांतर प्रकरणी संबंधित खासदारांकडून उत्तरे मागविण्यात आली असून, ती प्राप्त झाल्यानंतर संविधानाच्या दहाव्या अनुसूचीनुसार पुढील कारवाई सुरू केली जाईल, असे बिर्ला यांनी स्पष्ट केले. या प्रकरणी दहाव्या अनुसूचीनुसार एक निश्चित प्रक्रिया आहे. संबंधित सदस्यांची उत्तरे मिळताच कारवाई सुरू करू,' असे बिर्ला म्हणाले.


भारत-पोलंड व्यापार दुप्पट करू

नवी दिल्ली : भारत आणि पोलंड यांच्यातील द्विपक्षीय व्यापार २०३० पर्यंत दुप्पट करण्याचे लक्ष्य गुरुवारी निश्चित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्या बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात ही माहिती देण्यात आली.

भारत-युरोपीय महासंघ मुक्त व्यापार करारावर (एफटीए) लवकर स्वाक्षरी करून त्याला मान्यता देण्याचे आणि त्याची वेळेत अंमलबजावणी करण्याचे आवाहन दोन्ही नेत्यांनी केले. यामुळे व्यापार आणि गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण होतील, महत्त्वाच्या पुरवठा साखळ्या अधिक सक्षम होतील आणि नव्या बाजारपेठा खुल्या होतील, असे निवेदनात म्हटले आहे. मोदींनी पोलंडमधील कंपन्यांना भारतातील गुंतवणूक आणि व्यवसायविस्तार वाढविण्याचे आवाहन केले. भारतातील मोठी बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ तसेच उत्पादन आणि नवोन्मेष क्षेत्रातील वाढत्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. पोलंडमधील भारतीय गुंतवणुकीचे टस्क यांनी स्वागत केले. मध्य आणि पूर्व युरोप तसेच व्यापक युरोपीय बाजारपेठेत व्यवसायाचा विस्तार करू इच्छिणाऱ्या भारतीय कंपन्यांसाठी पोलंड हे प्रवेशद्वार ठरू शकते, असे त्यांनी नमूद केले.

संयुक्त राष्ट्रांची प्रासंगिकता, विश्वासार्हता आणि परिणामकारकता कायम राखण्यासाठी संरचनात्मक सुधारणांची गरज दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली.

अधिक सर्वसमावेशक, सुधारित आणि विस्तारित सुरक्षा परिषदेत भारताच्या सदस्यत्वाला पोलंडने पाठिंबा दर्शविला. २०२८-२९ या कालावधीसाठी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्यपदासाठी भारताच्या उमेदवारीला पाठिंबा असल्याचेही पोलंडने स्पष्ट केले.





EXTRACT OF UNAUDITED STANDALONE & CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED SEPTEMBER 30, 2026.

₹ In Crores

Particulars	Standalone						Consolidated					
	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended
	30.09.2026 (Unaudited)	30.06.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	30.09.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	31.03.2026 (Audited)	30.09.2026 (Unaudited)	30.06.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	30.09.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	31.03.2026 (Audited)
Total income from operation	680.73	600.14	554.67	1,280.87	1,021.41	2,044.15	715.06	652.80	583.55	1,367.86	1,091.92	2,184.95
Net Profit/(Loss) for the period before Tax and exceptional items	176.51	168.15	131.91	344.66	231.02	434.41	173.06	176.46	120.39	349.52	230.72	446.22
Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional items)	176.51	168.15	131.91	344.66	231.02	434.41	173.06	176.46	120.39	349.52	230.72	446.22
Net Profit/(Loss) for the period after tax and Exceptional items	139.87	126.58	106.52	266.45	181.11	334.73	129.44	132.65	91.23	262.09	174.25	338.23
Total Comprehensive Income for the period [Comprising profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	138.44	144.26	85.08	282.70	165.65	303.60	128.15	150.42	71.50	278.57	162.61	312.25
Equity Share Capital	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23
Reserves excluding Revaluation Reserve as at Balance sheet date				-	-	2,563.52				-	-	2,632.93
Earnings Per Share (not annualised) (face value of Rs.10 /- each)												
Basic :	60.20	54.49	45.85	114.69	77.96	144.08	55.71	57.10	39.27	112.81	75.00	145.59
Diluted:	60.20	54.49	45.85	114.69	77.96	144.08	55.71	57.10	39.27	112.81	75.00	145.59

Notes :

1) The above results have been prepared in accordance with Indian Accounting Standard (Ind As) under section 133 of the Companies Act, 2013 read with relevant Regulation 33 of the SEBI (LODR) Regulations, 2015, reviewed by the Audit Committee and approved and taken on record by the Board of Directors of the Company at their respective meetings held on 22nd October, 2026.
2) The Company operates in one segment only i.e. Polyester Films and therefore, has only one reportable segment in accordance with IND AS 108 "operating segments".
3) The above is an extract of the detailed format of Quarterly and Half Yearly Financial Results filed with the Stock Exchange under regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015. The full format of financial results are available on the website of stock exchanges(www.bseindia.com and www.nseindia.com) and also on the website of the Company (www.garwarehitechfilms.com).

The same can be accessed by scanning the QR Code provided below:

Place : Mumbai
Date : 22nd October, 2026

For GARWARE HI-TECH FILMS LIMITED

MONIKA GARWARE
VICE-CHAIRPERSON AND
JOINT MANAGING DIRECTOR
DIN : 00143400

GARWARE HI-TECH FILMS LIMITED

Registered Office : Naigaon, Post : Waluj, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad) - 431133 CIN : L10889MH1957PLC010889
Corporate Office : Garware House 50-A, Swami Nityanand Marg, Vile Parle (E), Mumbai-400 057
Website : www.garwarehitechfilms.com, **Telephone :** 6698 8000, **Email :** cs@garwarehitech.com

More Newspapers and Magazines telegram group join Search https://t.me/NewsTG8 (NewsTG8) ya Whatsapp ya telegram message this Number 8890050582

एमजीएमतर्फे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर आणि माऊली बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ईसारवाडी, ता. पैठण येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. एमजीएम रुग्णालयाच्या नेत्र विभागप्रमुख डॉ. सारिका गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नेत्र तपासणी करून घेतली.

या शिबिरामध्ये एकूण १२० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ५५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. या सर्व रुग्णांवर एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे पुढील उपचार व मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरासाठी एमजीएम रुग्णालयाच्या नेत्र विभागातील डॉ. रुपाली सक्सेना, डॉ. प्रिया मिश्रा तसेच समुपदेशक उज्वला भगत व सुमित गवळी यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच बाबासाहेब बोबडे, भरत खोंडे, अनिल देशमुख, संतोष शेजुळ, विठ्ठला आव्हाड, दीपक बोबडे, कृष्णा विठ्ठल बोबडे, विकास पाचोडे, मारुती बोबडे, आप्पा दादा आणि सोपान कल्याण बोबडे यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध होणार असून, नागरिकांमध्ये नेत्र आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार आहे. एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्र विभागामार्फत डॉ. सारिका गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी असे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

सुंदरता वाढवण्यासाठी बॉलिवूडची कुठली अभिनेत्री केसांना बिअर लावते? कोण चेहऱ्याला तूप लावतं?

बॉलिवूड अभिनेत्री आपल्या त्वचेची आणि केसांची काळजी घेण्यासाठी वेगवेगळ्या स्किन केअर आणि हेअर केअर प्रॉडक्ट्सचा वापर करतात. मात्र, अनेक अभिनेत्री महागड्या प्रॉडक्ट्स सोबतच आजीच्या काळापासून चालत आलेल्या घरगुती उपायांवरही विश्वास ठेवतात. तूप, बर्फ, बेसन, हळद आणि नारळाच्या तेलासारख्या नैसर्गिक घटकांचा त्या आपल्या ब्युटी रुटीनमध्ये समावेश करतात. जाणून घेऊया, कोणती अभिनेत्री त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी कोणते देसी उपाय वापरते.

जान्हवी कपूर केसांची काळजी घेण्यासाठी अंडी, बिअर आणि मेथी यांसारख्या घरगुती घटकांचा वापर करते. अंड्यामुळे केसांना चमक मिळण्यास मदत होऊ शकते, तर बिअरचा वापर केस मऊ आणि चमकदार दिसण्यासाठी केला जातो. मेथीचा पॅक केसांना आतून पोषण देण्यास मदत करतो.


आलिया भट्टचे आइस वॉटर रुटीन

आलिया भट्टच्या स्किन केअर रुटीनमध्ये बर्फाच्या पाण्याचा समावेश आहे. ती संध्याकाळी बर्फाच्या पाण्याने भरलेल्या भांड्यात काही २-३ सेकंद चेहरा बुडवते. असे ती साधारण ५ मिनिट करे. यामुळे चेहऱ्यावरील थकवा कमी होत असल्याचे ती सांगते.

करिश्मा कपूर लावते तूप

करिश्मा कपूरने एका मुलाखतीत सांगितले होते की, तिची आजी चेहऱ्यावर तूप लावत असे आणि तिच्याकडूनच तिने ही सवय शिकली. तुपातील स्निग्ध घटक त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करू शकतात.

प्रियांका चोप्राचे घरगुती फेस पॅक



प्रियांका चोप्रा त्वचेची काळजी घेण्यासाठी बेसन, दही आणि हळद यांपासून तयार केलेल्या उटण्याचा वापर करते. यामुळे त्वचा स्वच्छ ठेवण्यास मदत होते, असे ती सांगते.

दीपिका पदुकोण करते तेल मसाज

दीपिका पदुकोण केसांची काळजी घेण्यासाठी आठवड्यातून एकदा कोमट नारळाच्या तेलाने केसांना मसाज करते. या उपायामुळे केसांचा कोरडेपणा कमी होण्यास आणि केसांना चमक मिळण्यास मदत होऊ शकते.

श्रद्धा कपूरचे ॲलोव्हेरा जेल

श्रद्धा कपूर चेहऱ्याची काळजी घेण्यासाठी ॲलोव्हेरा जेलचा वापर करते. यामुळे त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते.

कतरिना कैफचा ओट्स फेस पॅक

कतरिना कैफ त्वचेची काळजी घेण्यासाठी ओट्स, साधे दही आणि मध यांचा फेस पॅक वापरते. या मिश्रणामुळे त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यास आणि डेड स्किन सेल्स काढण्यास मदत होऊ शकते. तसेच त्वचेचा कोरडेपणा कमी होण्यासही मदत होऊ शकते.



EXTRACT OF UNAUDITED STANDALONE & CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED SEPTEMBER 30, 2026.

₹ In Crores

Particulars	Standalone						Consolidated					
	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended	Quarter Ended			Half Year Ended		Year Ended
	30.09.2026 (Unaudited)	30.06.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	30.09.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	31.03.2026 (Audited)	30.09.2026 (Unaudited)	30.06.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	30.09.2026 (Unaudited)	30.09.2025 (Unaudited)	31.03.2026 (Audited)
Total income from operation	680.73	600.14	554.67	1,280.87	1,021.41	2,044.15	715.06	652.80	583.55	1,367.86	1,091.92	2,184.95
Net Profit/(Loss) for the period before Tax and exceptional items	176.51	168.15	131.91	344.66	231.02	434.41	173.06	176.46	120.39	349.52	230.72	446.22
Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional items)	176.51	168.15	131.91	344.66	231.02	434.41	173.06	176.46	120.39	349.52	230.72	446.22
Net Profit/(Loss) for the period after tax and Exceptional items	139.87	126.58	106.52	266.45	181.11	334.73	129.44	132.65	91.23	262.09	174.25	338.23
Total Comprehensive Income for the period [Comprising profit for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)]	138.44	144.26	85.08	282.70	165.65	303.60	128.15	150.42	71.50	278.57	162.61	312.25
Equity Share Capital	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23	23.23
Reserves excluding Revaluation Reserve as at Balance sheet date				-	-	2,563.52				-	-	2,632.93
Earnings Per Share (not annualised) (face value of Rs.10 /- each)												
Basic :	60.20	54.49	45.85	114.69	77.96	144.08	55.71	57.10	39.27	112.81	75.00	145.59
Diluted:	60.20	54.49	45.85	114.69	77.96	144.08	55.71	57.10	39.27	112.81	75.00	145.59

Notes :

1) The above results have been prepared in accordance with Indian Accounting Standard (Ind As) under section 133 of the Companies Act, 2013 read with relevant Regulation 33 of the SEBI (LODR) Regulations, 2015, reviewed by the Audit Committee and approved and taken on record by the Board of Directors of the Company at their respective meetings held on 22nd October, 2026.
2) The Company operates in one segment only i.e. Polyester Films and therefore, has only one reportable segment in accordance with IND AS 108 "operating segments".
3) The above is an extract of the detailed format of Quarterly and Half Yearly Financial Results filed with the Stock Exchange under regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements) Regulations, 2015. The full format of financial results are available on the website of stock exchanges(www.bseindia.com and www.nseindia.com) and also on the website of the Company (www.garwarehitechfilms.com).

The same can be accessed by scanning the QR Code provided below:

Place : Mumbai
Date : 22nd October, 2026

For GARWARE HI-TECH FILMS LIMITED

MONIKA GARWARE
VICE-CHAIRPERSON AND
JOINT MANAGING DIRECTOR
DIN : 00143400

GARWARE HI-TECH FILMS LIMITED

Registered Office : Naigaon, Post : Waluj, Chhatrapati Sambhajinagar (Aurangabad) - 431133 CIN : L10889MH1957PLC010889
Corporate Office : Garware House 50-A, Swami Nityanand Marg, Vile Parle (E), Mumbai-400 057
Website : www.garwarehitechfilms.com, **Telephone :** 6698 8000, **Email :** cs@garwarehitech.com

लिंबापेक्षा १० पट अधिक व्हिटॅमिन सी! १२००० फूट उंचीवर आढळणाऱ्या सूपरफूडची पीयूष गोयल यांनी शेअर केली माहिती

लडाख म्हटले की डोळ्यांसमोर उंच पर्वतरांगा, बर्फाच्छादित डोंगर आणि निसर्गाचे सुंदर दृश्य उभे राहते. मात्र, याच लडाखमध्ये एक खास फळ आढळते, ज्याला लडाख गोल्ड' म्हणून ओळखले जाते. या फळामध्ये लिंबाच्या तुलनेत तब्बल १० पट अधिक व्हिटॅमिन सी असल्याचा दावा करण्यात आला आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनीही सोशल मीडियावर या फळाची माहिती शेअर केली आहे.सी बकथॉर्न' (Sea Buckthorn) असे या फळाचे नाव असून, ते लडाखमधील नुब्रा खोऱ्यात सुमारे १२ हजार फूट उंचीवर आढळते. या फळाला भौगोलिक मानांकन म्हणजेच GI टॅगही मिळाला आहे.

काय आहे सी बकथॉर्न?

सी बकथॉर्न हे काटेरी झुडपावर वाढणारे लहान, पिवळसर-नारिंगी रंगाचे फळ आहे. हे झुडूप आशिया आणि युरोपमधील थंड प्रदेशांमध्ये आढळते. लडाखमधील अतिथंड हवामान आणि प्रतिकूल परिस्थितीतही हे झाड तग धरू शकते. या फळाची चव आंबट असते.



स्थानिक पातळीवर याला लेह बेरी' किंवा त्सेस्टा लुलू' असेही म्हटले जाते. त्याच्या सोनेरी-नारिंगी रंगामुळे त्याला लडाख गोल्ड' हे नाव मिळाले आहे.

लिंबापेक्षा १० पट अधिक व्हिटॅमिन सी?

सी बकथॉर्न हे व्हिटॅमिन सीचा चांगला स्रोत मानले जाते. पीयूष गोयल यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये या फळात लिंबाच्या तुलनेत १० पट अधिक व्हिटॅमिन सी असल्याचा दावा करण्यात आला आहे. एका संशोधन अहवालानुसार, लडाखमध्ये आढळणाऱ्या सी बकथॉर्नमध्ये प्रति १०० ग्रॅम सुमारे २७५ मिलिग्रॅम व्हिटॅमिन सी आढळल्याचे नमूद आहे. मात्र, त्याचे प्रमाण फळाची जात, हवामान आणि वाढीच्या परिस्थितीनुसार बदलू शकते.

कशामुळे मानले जाते सुपरफूड?

सी बकथॉर्नमध्ये व्हिटॅमिन सीसोबत व्हिटॅमिन ई, कॅरोटिनॉइड्स, काही बी जीवनसत्त्वे आणि ॲंटिऑक्सिडंट घटक आढळतात. हे घटक रोगप्रतिकारक शक्तीचे सामान्य कार्य, त्वचेतील कोलेजन निर्मिती आणि वनस्पतीजन्य पदार्थांमधील लोहाचे शोषण यांसाठी उपयुक्त ठरतात. या फळाच्या बिया आणि गरापासून मिळणाऱ्या तेलामध्येही विविध प्रकारची फॅटी ॲसिड्स असतात.

कसे करावे सेवन?

सी बकथॉर्नची चव आंबट असल्यामुळे अनेक जण हे फळ थेट खाण्याऐवजी त्यापासून तयार केलेल्या पदार्थांचे सेवन करतात. यापासून ज्यूस, फळांचा गर, जॅम आणि विविध पेये तयार केली जातात. तसेच, त्यापासून तेल आणि अर्कही बनवले जातात. या घटकांचा वापर काही ब्युटी प्रोडक्ट्स आणि स्किन केअरसाठी तयार करण्यात येणाऱ्या उत्पादनांमध्ये केला जातो.

'या' समस्या आहेत, तरीही लावताय मुलतानी माती? होऊ शकतं मोठं नुकसान, जाणून घ्या खास टिप्स

अनेक जण स्किनकेअरसाठी महागडे प्रॉडक्ट वारतात, तर अनेक लोक मुलतानी मातीचा वापर करतात. चेहरा उजळ करण्यासाठी आणि तेलकटपणा दूर करण्यासाठी मुलतानी मातीचा वापर करतात असं अनेकांना वाटतं. त्याचप्रमाणे, अनेक लोकांचा असा विश्वास आहे की ती लावल्याने त्वचा स्वच्छ आणि ताजीतवानी राहते. पण असं नसतं. प्रत्येकाची त्वचा वेगळी असते आणि मुलतानी माती प्रत्येक प्रकारच्या त्वचेसाठी योग्य नसते. तिचा चुकीच्या पद्धतीने किंवा वारंवार वापर केल्यास त्वचेमध्ये कोरडेपणा, जळजळ यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. या सगळ्यात प्रश्न असा आहे की, कोणत्या लोकांनी मुलतानी माती वापरू नये? तसेच, तिचा वापर करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत? तज्ज्ञांच्या मते, ज्या लोकांची त्वचा आधीच कोरडी आहे त्यांनी चेहऱ्याला मुलतानी माती लावणं टाळावं. यामुळे त्वचेतील ओलावा कमी होतो आणि त्वचेतील घट्टपणा आणि कोरडेपणाची समस्या वाढू शकते. तज्ज्ञांच्या मते, संवेदनशील त्वचेवर मुलतानी माती लावल्याने जळजळ, खाज किंवा लालसरपणा येऊ शकतो. ती लावल्यानंतर असा त्रास जाणवल्यास, ताबडतोब पाण्याने चेहरा धुवा आणि पुन्हा तिचा वापर करू नका. एक्झिमा असलेल्या किंवा आधीच जळजळ झालेल्या त्वचेवर मुलतानी माती लावल्याने स्थिती आणखी बिघडू शकते. अशा लोकांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय घरगुती उपाय करू नयेत. त्वचारोग तज्ज्ञांच्या मते, ज्यांची त्वचा कोरडी आहे त्यांनीही काळजी घेतली पाहिजे. त्वचा तेलकट असली तरी, तिच्यात पाण्याची कमतरता असू शकते. अशा परिस्थितीत, मुलतानी मातीच्या वारंवार वापरामुळे कोरडेपणा वाढू शकतो. तज्ज्ञांच्या मते, मुलतानी माती चेहऱ्यावर लावल्यानंतर ती सुकण्याची वाट पाहण्याची गरज नाही. फेस पॅक जास्त वेळ ठेवल्याने त्वचेत घट्टपणा आणि कोरडेपणा येऊ शकतो. तो दररोज लावणं देखील टाळावं. वापरानंतर हलकं मॉइश्चरायझर लावल्याने त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते. तसेच, काळजी घ्या आणि चेहऱ्यावर कोणतेही नवीन त्वचेची काळजी घेणारे उत्पादन किंवा घरगुती उपाय लावण्यापूर्वी पॅच टेस्ट करा.